**प्रेस नोट** दिनांक : ०४/०८/२०२२

**अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई.**

# ७०१ किलो ७४० ग्रॅम वजनाचा व रूपये १४०३ कोटी ४८ लाख किंमतीचा ''एम.डी. (मेफेड्रॉन)'' सदृश्य अंमली पदार्थ जप्त केलेबाबत.

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट यांनी एकूण ७०१ किलो ७४० ग्रॅम वजनाचा व रूपये १४०३ कोटी ४८ लाख किंमतीचा ''एम.डी. (मेफेड्रॉन)'' सदृश्य अंमली पदार्थ जप्त केला असुन मुंबई शहर व परिसरात मोठया प्रमाणात अंमली पदार्थाची पुरवठा करणारी आणि अंमली पदार्थाची निर्मिती, अवैधपणे करुन त्याचा व्यापार करणारी मोठी टोळी उघड करून त्यांना अटक करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| **गु.र.क्र. व कलम** | २५/२०२२, कलम-८(क) सह २२(क), २९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५. |
| **दाखल दिनांक** | दिनांक २९/०३/२०२२, वेळ-११:०० वा. |
| **गुन्हा घडला दिनांक, वेळ व ठिकाण** | दिनांक २९/०३/२०२२ रोजी ०३:३० वा. ते ०८:१५ वा. चे दरम्यान.<br>ठिकाण :- १) माता रमाबाई आंबेडकर मनोरंजन मैदान समोर,घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड,शिवाजीनगर, गोवंडी, मुंबई-४०००४३.<br>२) प्लॉट नं.४४, लाईन-एन, रुम नं.०२, शिवाजीनगर रोड नं.०३, गोवंडी, मुंबई-४०००४३.<br>------------------------------------------------------------<br>**दि.०३/०८/२०२२ रोजी जप्त केलेला 'एम.डी.(मेफेड्रॉन)सदृश्य हा अंमली पदार्थ ठिकाण**<br>**३) सिताराम बिल्डींग को.ऑ.हौ. सोसायटी, गाळा नं. ०१, हनुमान रोड, चक्रधर नगर, नालासोपारा पश्चिम, जि. पालघर** |
| **आरोपी संख्या** | ०५ (०४ पुरुष व ०१ महिला आरोपी) (आरोपी क्र. १ व २ हे न्यायालयीन कोठडी मध्ये असून आरोपी क्र. ३, ४ व ५ हे पोलीस कोठडी मध्ये आहेत.) |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | **दिनांक २९/०३/२०२२ रोजी**<br>**आरोपी क्र. ०१ याचेकडून :-**<br>१) २५० ग्रॅम 'एम.डी.'(मेफेड्रॉन)सदृश्य अंमली पदार्थ (किंमत रू. ३७,५०,०००/-)<br>**आरोपी क्र. ०२ याचेकडून :-**<br>१) २ किलो ६७० ग्रॅम 'एम.डी.'(मेफेड्रॉन) सदृश्य हा अंमली पदार्थ (किंमत रू. ०४,१४,००,०००/-)<br>(अशी दिनांक २९/०३/२०२२ रोजी एकूण ०३ किलो १० ग्रॅम 'एम.डी.'(मेफेड्रॉन) सदृश्य अंमली पदार्थ (किंमत रू. ०४,५१,५०,९००/- ) जप्त करण्यात आला.<br>------------------------------------------------------------<br>**दिनांक ०३/०८/२०२२ रोजी जप्त करण्यात आलेला अंमली पदार्थ**<br>**आरोपी क्र. ०५ यांचेकडून :-**<br>**१) ७०१ किलो ७४०ग्रॅम वजनाचा 'एम.डी.'(मेफेड्रॉन) सदृश्य हा अंमली पदार्थ (किंमत रू. १४०३ कोटी ४८ लाख )**<br>------------------------------------------------------------<br>**सदर गुन्हयात आतापर्यंत ०५ आरोपी अटक करण्यात आले असुन एकुण ७०४ किलो ८४० ग्रॅम वजनाचा 'एम.डी'(मेफेड्रॉन) सदृश्य हा अंमली पदार्थ (किंमत रू. १४०७,९९,५०,९००/-) (अक्षरी १४०७ कोटी ९९ लाख ५० हजार ९०० रूपये किंमत अंदाजे) जप्त करण्यात आला आहे.** |

**थोडक्यात हकीकत**:-

दिनांक २९/०३/२०२२ रोजी मा. वरिष्ठांच्या सुचनांप्रमाणे अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहीमेंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट, चे पथक, अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणारे, पुरवठा, साठा करणारे इसमांचा गस्तीदरम्यान शोध घेत असतांना शिवाजीनगर, गोवंडी, मुंबई परीसरातुन संशयित आरोपी क्र. १ यास २५० ग्रॅम 'एम.डी'(मेफेड्रॉन) सदृश्य अंमली पदार्थासह ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे केलेल्या सखोल चौकशीत सदरचा 'एम.डी'(मेफेड्रॉन) सदृश अंमली पदार्थ त्यास आरोपी क्र. २ याने पुरविलेला असल्याचे स्पष्ट झाले. पुढील तपासात आरोपी क्र. २ याचेकडुन २ किलो ७६० ग्रॅम वजनाचा 'एम.डी'(मेफेड्रॉन)सदृश्य अंमली पदार्थ इतर साहीत्यासह जप्त करण्यात आला.

त्यानंतर नमुद गुन्हयाचे तपासात संकलीत व विश्लेषण करण्यात आलेल्या माहितीच्या आधारे दिनांक २७/०७/२०२२ रोजी पाहिजे महिला आरोपी हिला कसोशीने शोध घेवुन अटक करण्यात आली. त्यानंतर नमुद महिला आरोपीकडे पोलीस कोठडी दरम्यान केलेल्या सखोल तपासात तिने दिलेल्या माहितीवरुन दिनांक ०२/०८/२०२२ रोजी आरोपी क्र.४ याला ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.

त्यानंतर दिनांक ०३/०८/२०२२ रोजी आरोपी क्र. ०४ याचेकडे पोलीस कोठडी दरम्यान केलेल्या सखोल तपासात तो ' एम.डी.'(मेफेड्रॉन) सदृश्य अंमली पदार्थ आरोपी क्र.५ याचेकडुन खरेदी करून गुन्हयातील अटक आरोपी क्र.३ व २ यांना देत असल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे आरोपी क्र.५ याला ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे.

आरोपीकडे पोलीस पथकाने केलेल्या तपासात प्राथमीक माहिती मिळाली की, त्याने रसायन शास्त्रामध्ये ऑरगॅनिक केमिस्ट्रीचे शिक्षण घेतलेले असुन वेगवेगळे केमीकल एकत्रित करून त्यावर रासायनिक प्रक्रिया करून 'एम.डी.' (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ बनविण्याचे ज्ञान त्याने आत्मसात केले आहे. तसेच तो मागणीप्रमाणे गिऱ्हाईकांना 'एम.डी.' (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ विकत असतो अशी माहिती मिळाली. तसेच स्वत:ची ओळख लपविण्यासाठी सदर आरोपी वेगवेगळया सोशल मिडीया प्लॅटफॉर्मचा वापर करून अंमली पदार्थ व्यवसाय करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

दिनांक ०३/०८/२०२२ रोजी आरोपी क्र. ०५ याचेकडे केलेल्या तपासात त्याचेकडुन **एकुण ७०१ किलो ७४० ग्रॅम वजनाचा 'एम.डी.'मेफेड्रॉन सदृश्य अंमली पदार्थ किंमत रू. १४०३ कोटी ४८ लाख** जप्त करण्यात आला आहे.

**अशा प्रकारे आजपर्यंत नमुद गुन्हयाच्या तपासामध्ये आरोपी क्र. १ याचेकडुन २५० ग्रॅम 'एम.डी.' (मेफेड्रॉन ) सदृश्य हा अंमली पदार्थ (किंमत रूपये ३७,५०,०००/-), आरोपी क्र. ०२ याचेकडुन २ किलो ७६० ग्रॅम 'एम.डी.' ( मेफेड्रॉन ) सदृश्य हा अंमली पदार्थ (किंमत रूपये ४,१४,००,०००/-) तसेच आरोपी क्र. ०५ याचेकडुन ७०१ किलो ७४० ग्रॅम वजनाचा 'एम.डी.'(मेफेड्रॉन) सदृश्य अंमली पदार्थ ( किंमत रू. १४०३ कोटी ४८ लाख ) असे एकुण ७०४ किलो ८४० ग्रॅम वजनाचा 'एम.डी'(मेफेड्रॉन) सदृश्य हा अंमली पदार्थ (किंमत रू. १४०७,९९,५०,९००/-) ( अक्षरी १४०७ कोटी ९९ लाख ५० हजार ९०० रूपये किंमत अंदाजे) जप्त करून अंमली पदार्थाची निर्मीत व व्यापार करणारे मोठे रॅकेट अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिटने उध्वस्त केले आहे.**

सदरचा ‘एम.डी’(मेफेड्रॉन)सदृश्य अंमली पदार्थ आरोपीने कोठे बनविला आहे याबाबतचा अधिक तपास करण्यात येत आहे.

अशा प्रकारे ‘अंमली पदार्थमुक्त समाज’ बनविण्याचे दृष्टीने बृहन्मुंबई शहर पोलीस आयुक्तालय सतत प्रयत्नशील आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसाळकर सो., मा. पोलीस सह आयुक्त(गुन्हे), डॉ. सुहास वारके सो., मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. विरेश प्रभु सो, मा. पोलीस उप आयुक्त, श्री. दत्ता नलावडे सो, व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री सावळाराम आगवणे, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिटचे प्रभारी पोलीस निरीक्षक संदिप काळे यांच्या नेतृत्वाखाली स.पो.नि. संतोष साळुंखे, स.पो.नि. अमोल कदम, पो.उ.नि. रविंद्र सावंत, पो.उ.नि. शैलेश देसाई, स.फौ. २८९९२/सुरेश साळुंखे, पो.ह.क्र. ९७०६४९/सुधीर साळुंखे, पो.ना.क्र. ०३-६५४/राजु तडवी, पो.ना.क्र. ०३-९१७/हरीश राठोड, पो.ना.क्र. ०३-१२४६/राजदिप दळवी, पो.ना.०३-१४१०/प्रितम ढोरे, पो.ना.क्र. ०४-०७३३/नितीन जाधव, पो.ना.क्र. ०६-१३८५/हणमंत येडगे, पो.शि.क्र. ०८-१६३२/महेश गायकवाड, पो.शि.क्र. ०९-०४८०/आकाश शेलार, म.पो.शि. ०७-१२४६/अनुराधा टेकाळे व स.फौ.चा.क्र. २८५७/राजेंद्र कदम, पो.ह.चा.क्र. ३३८४०/हनुमंत जाधव यांनी पार पाडली असून गुन्ह्याचा पुढील तपास मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पो.उप नि. रविंद्र सावंत हे करीत आहेत.

---//---